//०५//   संक्षिप्त फौ.प्र.क.३३६/२०१७
सविता वि. मदन
निशाणी क. २१ वर पुढे सुरू

**उलटतपास आरोपीतर्फ ॲड. श्री एन.पी. बागडे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरू**

मीना सोनेकर ही सालई डेपो येथे राहते. माझे घरून मीना सोनेकरच्या घरी जाण्यासाठी १०-१५ मिनीटे एवढा वेळ लागतो. मीना सोनेकर ही सालई येथील महिला बचत गटाची अध्यक्षा आहेत. मी महिला बचत गटाची सदस्य आहे. बचत गटात आम्ही काम करीत असल्यामुळे आमचे एकमेकांच्या घरी जाणे येणे आहे. मीना सोनेकरच्या घरी जात असल्याने तीचेसोबत व तीचे पतीसोबत माझी ओळख आहे. नंदा नेवारे ही माझी सख्खी जाउ आहे. मी गोवारी समाजाची आहे. आरोपी गोंड जातीचा असुन आदिवासी समाजाचा आहे. आरोपीचा व माझा समाज वेगळा आहे. आरोपीने मला रू २०,०००/- कोणत्या तारखेला, कोणत्या महिन्यात व कोणत्या वर्षी दिले होते हे मला सांगता येत नाही. साक्षीदार सांगते की ते पावसाळयाचे दिवसात शेती कामासाठी दिले होते. आरोपीने माझी जाउ नंदाचेसमक्ष मला रू २०,०००/- दिले होते.  सदर व्यवहाराबाबत लिखापढी काही केली नव्हती. मी आरोपीचे पैसे एक-दोन महिन्यानंतर परत केले होते. मी माझे वडिलांकडुन पैसे आणुन आरोपीचे पैसे परत दिले.

आरोपीच्या मुलीचे लग्न अंदाजे तीन-चार वर्षापुर्वी झाले आहे हे म्हणणे खरे आहे. मी त्या लग्नात गेली होती. आरोपीची मुलगी कोणत्या गावात दिली आहे हे माझे लक्षात नाही. आरोपीच्या मुलीचे नाव मला माहित नाही.  आरोपीच्या मुलीला किती मुलबाळ आहे हे मला माहित नाही.

**प्रश्न :** तुम्ही आरोपीच्या मुलीच्या लग्नाला गेले नव्हते ? व लग्नाला गेल्याचे खोटे  सांगत आहात ?

*सदर प्रश्नास फिर्यादीचे वकील श्री जी. आर मेश्राम यांनी अशी हरकत घेतली की साक्षीदार आरोपीच्या मुलीचे लग्नात गेली होती ही बाब उलटतपासात आली आहे, म्हणुन सदरचा सुचक प्रश्न विचारता येणार नाही. आरोपीचे वकील श्री एन.पी.बागडे यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीच्या*

DISTRICT COURT NAGPUR

*वतीने फिर्यादी साक्षीदारास ती खोटे बोलते  असा सुचक प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे.*

**<u>आदेश</u>** :  साक्षीदाराचे सरतपासाचे शपथपत्राचे अवलोकन केले असता साक्षीदाराने आरोपीच्या मुलीच्या लग्नात गेल्याबाबत पुरावा दिलेला नाही व साक्षीदार आरोपीच्या मुलीच्या लग्नाला गेल्याची बाब आरोपींचे वकीलांनी उलटतपासात अभिलेखावर आणली आहे. त्यामुळे विचारलेला  सुचक प्रश्न विचारता येणार नाही. करिता फिर्यादीच्या वकीलांची हरकत मंजुर करण्यात येते.

आरोपीला रू ६०,०००/- दिल्याचे माझे शपथपत्रात लिहिले आहे परंतु ते कोणत्या तारखेला दिले हे मी सांगु शकत नाही.

**<u>आरोपींच्या वकीलांचे तोडी विनंतीवरून पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक  १७.०१.२०१९

समक्ष

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक  १७.०१.२०१९

DISTRICT COURT NAGPUR